# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांकः08.12.2024** **वारः रविवार**

---

-भारतीय संस्कृतीचं अंगभूत मूल्य म्हणून सेवा तत्त्व महत्वाचं – पंतप्रधानांचं प्रतिपादन; समाजाच्या सुधारणेसाठी स्वयंसेवकांना राष्ट्र उभारणीत योगदान देण्याचं आवाहन.

• 2025 पर्यंत देशाला क्षयमुक्त करण्यासाठी 100 दिवसांच्या टीबी निर्मूलन मोहीमेचा आरंभ.

• सीरियन बंडखोरांनी जवळपासची शहरे ताब्यात घेतल्यानंतर सरकारच्या ताब्यात असलेल्या राजधानी दमास्कसला वेढा घातला.

• जागतिक संघर्षांचं निराकरण करण्यासाठी अधिक नाविन्यपूर्ण आणि सहभागी मुत्सद्देगिरीचं परराष्ट्र मंत्री एस. जयशंकर यांचं आवाहन.

-विश्व बुद्धिबळ स्पर्धेत डी गुकेश आणि डिंग लिरेन दहाव्या फेरीतही बरोबरीत आणि

-ऍडलेड कसोटीत भारताची ऑस्ट्रेलियासमोर कठीण कसोटी

<u>बॅप्स</u>

भारतीय संस्कृतीचं अंगभूत मूल्य म्हणून सेवेच्या तत्त्वावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी भर दिला आहे. अहमदाबादमध्ये **BAPS** कार्यकर्ता सुवर्ण महोत्सवाला संबोधित करताना, मोदी यांनी स्वयंसेवकांना समाजाच्या भल्यासाठी संकल्प साध्य करून राष्ट्र उभारणीत योगदान देण्याचं आवाहन केलं. पंतप्रधान म्हणाले की, आज भारत 2047 पर्यंत विकासाच्या ध्येयाच्या दिशेनं काम करत आहे. देशाच्या सांस्कृतिक आणि आध्यात्मिक वारशाचा जागतिक स्तरावर प्रसार करण्यासाठी मोदी यांनी **BAPS** च्या योगदानावर प्रकाश टाकला. युक्रेनमधील युद्धादरम्यान भारतीय नागरिकांना बाहेर काढण्यासाठी **BAPS** नं केलेल्या प्रयत्नांचीही पंतप्रधानांनी प्रशंसा केली. जगभरातील 30 देशांतील सुमारे 1 लाख स्वयंसेवक या कार्यक्रमात भाग घेत आहेत.

<u>नड्डा</u>

क्षयरोगमुक्त भारताचं उद्दिष्ट साध्य करण्याच्या प्रयत्नात कोणतीही उणीव ठेवली जाणार नाही, असं केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री जे.पी. नड्डा यांनी काल सांगितलं. पंचकुला इथून 100 दिवसांच्या देशव्यापी क्षयरोग निर्मूलन मोहिमेचा शुभारंभ केल्यानंतर
कार्यक्रमाला संबोधित करताना ते म्हणाले की 2025 पर्यंत देशाला क्षयरोगमुक्त करण्यासाठी क्षयरोग निर्मूलन कार्यक्रम मैलाचा दगड ठरेल तसंच क्षयरोगाचा विळखा मोडून काढण्यासाठी धोरणबदलासह सर्वतोपरी प्रयत्न केले जात आहेत. क्षयरोगाच्या रुग्णांना आयुष्मान भारत-प्रधानमंत्री जन आरोग्य योजनेचा लाभ मिळत असून रुग्णांना महिन्याला हजार रुपये दिले जात असल्याची माहिती त्यांनी दिली. यावेळी हरियाणाचे मुख्यमंत्री नायब सिंग सैनी आणि आरोग्य मंत्री कुमारी आरती सिंह राव उपस्थित होते. ३३ राज्यं आणि केंद्रशासित प्रदेशातील ३४७ जिल्ह्यांमध्ये ही मोहीम सुरू करण्यात आली आहे. या मोहिमेमध्ये क्षयरोगाची प्रकरणं शोधणे, उपचारांमध्ये होणारा विलंब कमी करणे आणि विशेषत: उच्च जोखीम असलेल्या गटांमध्ये उपचाराचे परिणाम सुधारणे यावर भर दिला जाईल.

<u>पीएम</u>

देशाच्या टीबी विरोधातल्या लढ्यात, अधिक भार असलेल्या टीबी जिल्ह्यांवर लक्ष केंद्रित करून 100 दिवसांच्या विशेष मोहीमेमुळे देश बळकट झाला आहे असं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. समाज माध्यमांवरील एका संदेशात मोदी यांनी सांगितलं की, रुग्णांना दुप्पट मदत, जन भागिदारी, नवीन औषधं, तंत्रज्ञानाचा वापर आणि निदानाची उत्तम साधनं यासह भारत विविध पद्धतींनी टीबीशी लढा देत आहे. क्षयरोगाचा नायनाट करण्यासाठी सर्वांनी एकत्र येण्याचं आवाहन त्यांनी केलं. यापूर्वी केंद्रीय आरोग्य मंत्री जेपी नड्डा यांच्या संदेशाला उत्तर देताना

पंतप्रधान म्हणाले की, निक्षय मित्रसारखे उपक्रम आणि लहान आणि प्रभावी उपचारांमुळं टीबीचं प्रमाण लक्षणीयरीत्या कमी झालं आहे, रुग्ण बरे होण्याचा दर सुधारला आहे आणि क्षयरोगाशी लढण्यात भारताचं जागतिक नेतृत्व भक्कम झालं आहे.

सीतारामन
केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांनी काल नवी दिल्ली इथं आगामी केंद्रीय अर्थसंकल्प 2025-26 च्या संदर्भात विविध शेतकरी संघटना आणि अग्रगण्य कृषी अर्थतज्ज्ञांसोबत दुसऱ्या टप्प्यातली अर्थसंकल्पपूर्व सल्लामसलत केली. त्यांनी सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांमधील भागधारकांशी चर्चादेखील केली. या बैठकीला अर्थ राज्यमंत्री पंकज चौधरी, वित्त सचिव, दीपम् चे सचिव आणि आर्थिक व्यवहार विभागाचे सचिव देखील उपस्थित होते.

सशस्त्रसेनाध्वजदिन
देशाच्या शूर जवानांच्या शौर्य, निर्धार आणि बलिदानाला सलाम करण्यासाठी सशस्त्र सेना ध्वज दिन असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हंटलं आहे. जवानांचं शौर्य आपल्याला प्रेरणा देतं आणि त्यांच्या त्यागापुढं आपण सर्वच नतमस्तक होतो, असं आपल्या संदेशात मोदी यांनी म्हंटलं आहे. सशस्त्र सेना ध्वज दिन निधीत योगदान देण्याचं आवाहनही त्यांनी काल केलं.

बीएएसएफ
सीमा सुरक्षा दलाचा ६० वा वर्धापन दिन आज जोधपूरमध्ये साजरा केला जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित राहाणार आहेत. जोधपूरमधल्या सीमा सुरक्षा दलाच्या राजस्थान फ्रंटिरियर हेडक्वार्टरमध्ये पहिल्यांदाच संचलनाचं आयोजन करण्यात आलं आहे. यामध्ये श्वानपथकाचाही समावेश असेल. यावेळी सात सैनिकांना शौर्य पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे. स्वदेशी हेलिकॉप्टर ध्रुव आणि एमआय१७ देखील संचलनात सामील होतील.

सीरिया
सीरियात दीर्घकाळ चाललेल्या संघर्षाच्या नाट्यमय घडामोडींमध्ये, बंडखोर सैन्यानं दमास्कसला वेढा घालण्याची मोहीम सुरू केली आहे, 2018 नंतर या राजधानीसाठी पहिला महत्त्वाचा धोका यामुळं निर्माण झाला आहे. हयात तहरीर अल शाम यांच्या नेतृत्वाखालील बंडखोर युतीचे प्रवक्ते हसन अब्दुलगानी यांनी दमास्कसला वेढा घालण्याच्या आपल्या कारवाईचा "अंतिम टप्पा" सुरु असल्याचं जाहीर केलं.

आपल्या क्षेत्राजवळील वाढत्या संघर्षाला प्रतिसाद म्हणून, इस्रायलच्या सैन्यानं गोलान हाइट्समध्ये आपली लष्करी उपस्थिती भक्कम केली आहे. इस्रायली सैन्याने इस्रायली सीमेजवळ असलेल्या हॅदर शहराजवळ बंदूकधाऱ्यांनी केलेला हल्ला परतवून लावण्यासाठी संयुक्त राष्ट्रांच्या सैन्याला मदत केली.

भारताने आपल्या नागरिकांना पश्चिम आशियाई राष्ट्रातील वर्तमान परिस्थिती लक्षात घेऊन पुढील सूचना मिळेपर्यंत सीरियाचा सर्व प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे. रशिया आणि अमेरिकेनंही आपल्या नागरिकां सावधगिरीचा सल्ला दिला आहे. जॉर्डनचे गृहमंत्री माझेन फरायाह यांनी दक्षिण सीरियातील सुरक्षिततेच्या परिस्थितीमुळं सीरियासोबतची जाबेर सरहद्द बंद करण्याची घोषणा केली आहे.

जयशंकर
परराष्ट्र मंत्री एस जयशंकर यांनी जागतिक संघर्ष सोडवण्यासाठी अधिक नाविन्यपूर्ण आणि सहभागी मुत्सद्देगिरीच्या गरजेवर भर दिला आहे. रशिया-युक्रेन संघर्षात युद्ध सुरू ठेवण्यापेक्षा वाटाघाटी करण्याकडे त्यांनी लक्ष वेधलं आहे. डॉक्टर जयशंकर कतारमधील दोहा फोरम 2024 मध्ये 'नव्या युगातील संघर्ष मध्यस्थी' या विषयावरील चर्चेत बोलत होते. रशिया-युक्रेन संघर्षात भारताच्या संतुलित भूमिका विषद करत, वाढत्या खर्चामुळे फटका बसलेल्या विकसनशील देशांना पाठिंबा दर्शवला. संघर्षाच्या आर्थिक परिणामामुळे बाधित झालेल्या सव्वाशेहून अधिक देशांच्या हितसंबंधांचे प्रतिनिधित्व करत संवाद साधण्याच्या भारताच्या भूमिकेचं त्यांनी वर्णन केलं. ते म्हणाले की, भारत या मुद्द्यावर सर्व बाजूंच्या नेत्यांशी संवाद साधण्यासाठी राजनैतिक प्रयत्न करत आहे. २२ व्या दोहा फोरमची कालपासून सुरुवात झाली असून दीडशेहून अधिक देशांतील साडेचार हजारहून अधिक प्रतिनिधी त्यात सहभागी झाले आहेत.

अष्टलक्ष्मी
ईशान्य भारताच्या आठ राज्यांच्या सांस्कृतिक समृद्धी आणि विविधतेचा सन्मान करण्यासाठी दिल्लीत अष्टलक्ष्मी महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. गेल्या तीन दिवसांपासून सुरू असलेल्या महोत्सवाचा आज समारोप आहे. अडीचशेहून अधिक कारागीरांनी हस्तकला, हातमाग तसंच भौगोलिक मानांकन मिळालेल्या उत्पादनांसह फळे, कृषी उत्पादने सादर केली आहे. ग्रामीण हाट बाजार हे मोठं आकर्षण असून इथे विविध उत्पादने ठेवली आहेत.

**<u>हॉकी</u>**

हॉकीमध्ये, मस्कत इथं महिला कनिष्ठ आशिया चषक स्पर्धेत भारतीय संघ आज बांगलादेशविरुद्ध आपली मोहीम उघडणार आहे. भारतीय कनिष्ठ महिला संघाचं नेतृत्व कर्णधार ज्योती सिंग करत आहे, तर साक्षी राणा उपकर्णधार आहे. ही स्पर्धा पुढील वर्षी चिली इथं आंतरराष्ट्रीय हॉकी महासंघाद्वारे आयोजित कनिष्ठ विश्वचषक स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धा आहे. स्पर्धेतील अव्वल पाच संघ विश्वचषकासाठी पात्र ठरतील.

**<u>बुद्धिबळ</u>**

जागतिक बुद्धिबळ अजिंक्यपद स्पर्धेमध्ये भारताचा ग्रँडमास्टर दोम्माराजू गुकेश आणि गतविजेता चीनचा डिंग लिरेन यांच्यातील दहावा सामना काल सिंगापूर इथं अनिर्णित राहिला. लिरेन आणि गुकेश प्रत्येकी 5 गुणांवर बरोबरीत आहेत तर अडीच दशलक्ष अमेरिकन डॉलर बक्षीस रक्कमेच्या या स्पर्धेतील चार खेळ बाकी आहेत. 14 फेऱ्यांनंतरही सामना बरोबरीत राहिल्यास, वेगवान बुद्धिबळपटू विजेता ठरेल.

**<u>क्रिकेट</u>**

ॲडलेड ओव्हल इथं सुरू असलेल्या बॉर्डर-गावस्कर करंडक क्रिकेट स्पर्धेतील भारताविरुद्धच्या दुसऱ्या कसोटी सामन्यात ऑस्ट्रेलियानं आपलं वर्चस्व कायम राखलं. काल दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतानं ५ गडी गमावून १२८ धावा केल्या होत्या. यजमान संघाच्या पहिल्या डावातील धावसंख्येपेक्षा भारत अद्यापही २९ धावांनी पिछाडीवर आहे. तत्पूर्वी ऑस्ट्रेलियानं 1 बाद 86 धावांवर दिवसाची सुरुवात करताना पहिल्या डावात ३३७ धावा करत १५७ धावांची आघाडी घेतली. ट्रॅव्हिस हेडनं १४१ चेंडूत १४० धावा केल्या. भारतानं पाच सामन्यांच्या या मालिकेत १-० अशी आघाडी घेतली आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं. नमस्कार.